ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख १८ एप्रिल, १९५६ | अंक १६

## विविध माहिती

**पाकिस्तानांतून आलेले निर्वासित**—चालू वर्षाच्या सुरवातीपासून पाकिस्तानांतून भारतांत येणाऱ्या निर्वासितांना मदत करण्यासाठी आणि त्यांची पुनर्वसाहत करण्यासाठी भारतीय सरकार दररोज १ लाख रुपये खर्च करीत आहे. १९५६–५७ सालच्या अंदाजपत्रकांत ह्या कार्यासाठी ५१ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. त्यापैकीं ३४ कोटी रुपये निर्वासितांची पुनर्वसाहत करण्यासाठी खर्च करण्यांत येतील.

**चिनी सरकारची मदत**—गेल्या वर्षी इंडोनेशिआला जात असलेलें 'काश्मीर प्रिन्सेस' हें भारतीय विमान समुद्रांत कोसळून त्यामधील प्रवासी व कांहीं वैमानिक नोकर मृत्यु पावले होते. मृत्यु पावलेल्या भारतीय नोकरांच्या कुटुंबियांना मदत म्हणून चीनचे पंतप्रधान चो-इन-लाय ह्यांनीं भारतीय सरकार-कडे ८२,००० रुपयांची रक्कम पाठविली आहे.

**गिरणी कामगारांना बोनस**—मदुरा, तुतिकोरीन आणि अंबासमुद्रम् येथील २४,००० गिरणी कामगारांना १९५५ सालचा बोनस म्हणून २५ लाख रुपये मिळणार आहेत. कामगारांची संघटना व गिरणी मालक ह्यांच्यांत तसा करारच करण्यांत आला आहे. सर्व कामगारांना त्यांच्या मूळच्या मासिक पगारा-प्रमाणें ४ महिन्यांचा बोनस देण्यांत येईल.

**मध्यप्रदेशाचा पंचवार्षिक कार्यक्रम**—मध्यप्रदेश सरकार-च्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १२३·५ कोटी रुपये खर्च करण्याचा संकल्प जाहीर करण्यांत आलेला आहे. राज्यांतील बेकारी नाहींशी करण्यासाठी ४,७०,००० नवीन नोकऱ्या उपलब्ध करून देण्याचा सरकारचा विचार आहे. त्यापैकीं ३,२७,०६७ नोकऱ्या सार्वजनिक मालकीच्या भागांत मिळूं शकतील.

**दूधदुभत्याच्या धंद्याची वाढ**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्य-क्रमाच्या अवधींत देशांतील दूधदुभत्याच्या धंद्याचा मोठ्या-प्रमाणावर विकास करण्यांत येणार असल्याचें भारतीय सरकारचे शेतकी मंत्री, डॉ. पंजाबराव देशमुख ह्यांनीं जाहीर केलें आहे. कलकत्ता, दिल्ली, मद्रास आणि मुंबई ह्या शहरांतून आणखी दुग्धालयें स्थापन करण्यांत येणार असल्याचें त्यांनीं सांगितलें.

**ल्हासाला जाणारा रेल्वेचा रस्ता**—तिबेटची राजधानी ल्हासा येथें जाण्यासाठी रेल्वेमार्ग बांधण्यांत येणार असल्याचें चिनी उपपंतप्रधानांनीं जाहीर केलें आहे. ही रेल्वे ज्या भागांतून जाणार आहे त्यापैकीं कांहीं ठिकाणीं विविध प्रकारची खनिज संपत्ति असल्यामुळें तेथे नवे औद्योगिक कारखाने निघण्याची शक्यताहि ध्वनित करण्यांत येत आहे.

**गगनचुंबी इमारती नकोत**—मद्रास शहरांत गगनचुंबी इमारती बांधल्या जाऊं नयेत, असें मत श्री. राजगोपालाचारिअर यांनीं व्यक्त केलें आहे. अशा इमारती बांधल्या तर समुद्रावरील मोकळी हवा शहरांत खेळण्यास अडथळा होईल; म्हणून त्यांनीं विरोध दर्शविला आहे. अशा इमारती निदान दक्षिणोत्तर बांधण्यांत येऊं नयेत, असें त्यांचें म्हणणें आहे.

**इटलींतहि हुंडा द्यावा लागतो**—भारताप्रमाणें इटलींतहि लग्नप्रसंगीं मुलीच्या बाजूला हुंडा द्यावा लागतो. त्यामुळें गरीब इटालिअन कुटुंबांतील मुली आपल्या विवाहासाठी लागणारा हुंडा स्वतःच मिळविण्याच्या खटपटींत असतात. इटलीमधून ब्रिटन-मध्यें येऊन जरूर तो पैसा साठविण्यासाठी दरसाल २,००० मुली देशांतर करतात. प्रत्येक मुलीला सरासरी १०० पौंड रक्कम जमवावी लागते.

**हैड्रोजन बाँबच्या स्फोटाचें नियंत्रण**—हैड्रोजन बाँबचा स्फोट झाल्यावर जी कोट्यवधि डिग्रीची उष्णता एका क्षणांत उत्पन्न होते तीवर नियंत्रण ठेवतां आलें तर त्या शक्तीचा औद्योगिक कार्यासाठी वापर करणें शक्य होईल. हा ताबा मिळविण्याच्या कामीं बऱ्याच अडचणी असून आणखी १० वर्षें तरी त्या दूर होण्यासारख्या नाहींत. पण अमेरिकन शास्त्रज्ञांनीं ह्या कामीं थोडेंबहुत यश मिळविलें आहे असें समजतें.

**जपानी रेल्वे एंजिनें**—भारतीय सरकारनें रेल्वेची सामुग्री तयार करणाऱ्या एका जपानी कारखान्याकडून वाफेवर चालणारीं सहा रेल्वेचीं एंजिनें विकत घेण्याचे ठरविलें आहे. सर्व एंजिनांची मिळून किंमत सुमारें १० कोटी येन होईल. रुपयांच्या चलनांत हीच रक्कम अंदाजे १३,३०,००० रुपये भरेल. ह्या संबंधीचा जरूर तो करार नुकताच करण्यांत आला.

**जामनगरसाठी टाऊन हॉल**—जामनगर म्युनिसिपालिटीनें आपल्यासाठी टाऊन हॉल बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या इमारती-साठी १,५०,००० रुपये खर्च होणार आहेत. सौराष्ट्र सरकारनें ३०,००० रुपयांची मदत दिली असून एका धर्मादाय संस्थेतर्फें ५१,००० रुपयांची देणगीहि मिळाली आहे. इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ नुकताच पार पडला.

**भारताची अर्जेंटायनाला मदत**—अर्जेंटायना देशांत नुकतीच पोलिओची साथ येऊन गेली. ह्या साथींत सांपडलेल्या रुग्णांना भारतीय रेड क्रॉस तर्फे चादरी व इतर कांहीं साहित्य पाठविण्यांत येणार आहे. रुग्णसाहित्याची किंमत ३,००० रुपयापर्यंत होईल. मदत अर्जेंटायनाच्या रेडक्रॉसच्या हवालीं करण्यांत येईल.

## सहकारी कायद्याचें कलम ७०

लेखकः—श्री. स. वा. कुलकर्णी, बी.ए., एलएल्.बी., पुणें.

मुंबई सहकारी सोसायट्यांच्या १९२५ च्या कायद्याच्या कलम ७० अन्वयें सहकारी संस्थांच्या विरुद्ध कांहीं बाबतींत दावे दाखल करावयाचे झाल्यास त्याअगोदर विशिष्ट स्वरूपाची नोटीस मे. रजिस्ट्रार को. सो. यांना द्यावी अशी तरतूद सदरचे कलमांत केलेली आहे. सहकारी संस्थांचे विरुद्ध लावलेल्या दाव्यांत कांहीं वेळां असें स्पष्ट दिसून येतें कीं, पक्षकारास अगर सल्ला देणाऱ्यास सदरच्या कलमांत केलेल्या तरतुदींची योग्य ती जाणीव न झाल्यामुळें अशा प्रकारचे दावे नोटीसा न देतां लावले गेलेले आहेत. अशा प्रकारचे पूर्वनोटीस न दिलेले दावे अर्थातच कोर्टांत रद्द होतात व पक्षकाराचा खर्च व श्रम वायां जावून कांहीं वेळेस अतिशय नुकसान पदरीं येतें. सिव्हिल प्रोसीजर कोडाचें कलम ८० अन्वयें अशाच स्वरूपाची नोटीशीची तरतूद केलेली आहे. ज्यावेळीं सरकारविरुद्ध एकादा दावा एखाद्या पक्षकारास दाखल करावयाचा असतो त्यावेळीं पूर्व नोटीस देऊन, सदरची नोटीस मिळून दोन महिन्यांचा कालावधि गेल्याशिवाय अशा पक्षकारास सरकारविरुद्ध दावा लावतां येत नाहीं अगर लावलेल्या दाव्यांत यश मिळत नाहीं. अशा प्रकारची तरतूद कायद्यामध्यें घालणेचा उद्देश हा कीं सरकारविरुद्ध लावल्या जाणाऱ्या दाव्यांची सत्यासत्यता सरकारास पडताळून पाहणेसाठीं अवधि मिळावा व हाताखालील नोकरांनीं अन्यायानें अगर बेकायदेशीरपणें काम केलें असल्यास पक्षकारावर त्यामुळें झालेल्या अन्यायाचें निराकरण करतां यावें व दाव्याचा खर्च सरकारवर येऊं नये. मुंबई सहकारी सोसायटींच्या कायद्यांत कलम ७० ची तरतूद करणेचा उद्देशहि हाच कीं, सहकारी सोसायटींचे विरुद्ध लावल्या जाणाऱ्या दाव्याबाबत खरी वस्तुस्थिति काय आहे हें मे. रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् यांना समजावें व सोसायटीचे हक्क-हितसंबंध काय स्वरूपाचे आहेत अगर त्याबाबत पक्षकारांचे हक्क कोणते अगर दावा लावणेपूर्वी समझोता होणेची शक्यता आहे किंवा कसें ह्या सर्व बाबींचा विचार करण्याकरितां अवधि मिळावा व सोसायटीविरुद्ध दावा न लागतां न्याय मिळावा. सोसायटीविरुद्ध लावल्या जाणाऱ्या सर्वच दाव्यांत त्यापूर्वी कलम ७० अन्वयें नोटीस दिलीच पाहिजे असा मात्र गैरसमज होणेची शक्यता आहे. ज्या सहकारी संस्थांच्या व्यवहाराशीं संबंध असणाऱ्या कामकाजाबाबत सोसायटी अगर तिचे पदाधिकारी ह्यांचेविरुद्ध दावा दाखल करण्यापूर्वी कलम ७० मध्यें नमूद केलेली नोटीस संबंधीं पक्षकारानें रजिस्ट्रार को. सोसायटी यांना द्यावयास पाहिजे. सदरच्या नोटीशींत पक्षकाराचें नांव, धंदा, उमर व राहण्याचें ठिकाण, दाव्यास घडलेलें कारण व तो मागत असलेल्या दादी ह्यांचा संपूर्ण उल्लेख असावयास पाहिजे आहे व अशी नोटीस मे. रजिस्ट्रार यांना मिळाल्यापासून अगर त्यांचे ऑफिसांत दिल्यातारखेपासून दोन महिन्यांचा कालावधि संपेतोंपर्यंत संबंधीं पक्षकारास सदरचे संस्थेविरुद्ध दावा लावतां येणार नाहीं. याखेरीज वर उल्लेख केलेल्या स्वरूपाची नोटीस दिलेली आहे अशा मजकुराची रचनाहि दाव्यांत सदरचे कलमान्वयें करावयास पाहिजे. वरील तपशीलवार विवेचन करणेचा हेतु हा कीं सहकारी संस्थांच्या विरुद्ध वर उल्लेख केलेल्या बाबतींत दावा दाखल करावयाचे अगोदर संबंधीं पक्षकारानें कलम ७० अन्वयें नोटीस दिलेली आहे कीं नाहीं, हें पाहणें अगत्याचें आहे. दिवाणी कोर्टांत सहकारी संस्थांच्या विरुद्ध दाव्यांत वर उल्लेख केलेल्या बाबतींत नोटीस न देतां दावा लावला असल्यास, सदरचा दावा कलम ७० यांत नमूद केलेल्या नोटीशीशिवाय चालूं शकतो काय असा प्राथमिक स्वरूपाचा मुद्दा प्रारंभींच उपस्थित करणेत येतो व त्या मुद्याच्या यशापयशावर पुढील दाव्याचा निर्णय अवलंबून राहतो. कांहीं वेळां असेंहि दृष्टोत्पत्तीस येतें कीं, कलम ७० यांत नमूद केलेल्या स्वरूपाची नोटीस न देतां दावा लावला गेल्यामुळें सदरचा दावा काढून घेऊन त्याच कारणावरून नोटीस देऊन दावा परत दाखल करणेची परवानगी कोर्टांत मागणेचा पर्याय शोधून काढल्यास, दरम्यान सदरचा दावा मुदतीबाहेर गेलेला असल्यामुळें असा मार्ग सोडून द्यावा लागतो. सहकारी संस्थांच्या विरुद्ध दावा लावावयाचे अगोदर योग्य ती शहानिशा करून घेऊन व कलम ७० मधील तरतुदींची अंमलबजावणी झाली आहे याची खात्री करून घेऊन मगच दावे दाखल करणें श्रेयस्कर आहे.

---

**इतिहासकाराची भेट**—जगप्रसिद्ध ब्रिटिश इतिहास-लेखक, मि. अर्नोल्ड टॉइनबी, पुढील वर्षाच्या आरंभीं भारताला भेट देणार आहेत. मि. टॉइनबी आपल्या भेटींत मुंबई, मद्रास, कलकत्ता व दिल्ली ह्या शहरांचा दौरा करतील. त्याचप्रमाणें मद्रास, आंध्र, अन्नमलाई व म्हैसूर विद्यापीठातर्फे त्यांचीं भाषणेंहि होणार आहेत. बंगलोर येथील भारतीय सांस्कृतिक संस्थाहि ते पाहणार आहेत.


माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

दि
**बँक ऑफ महाराष्ट्र लि.**
**शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५**

भांडवल

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ८,७५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. सहा कोटींचे वर |

संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) | श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष) |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. फ. दो. पदमजी | श्री. मा. वी. शहा |
| श्री. भा. म. गुप्ते | रा. ब. म. बा. जांभेकर |

श्री. म. स. पारखे

हेड ऑफिस, डेकन जिमखाना-पुणें, सोलापूर ( फलटण गल्ली शाखा ), नाशिक, अहमदनगर, श्रीरामपूर, किर्लोस्करवाडी व पनवेल येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची सोय आहे.

मुख्य कचेरीः-
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १८ एप्रिल, १९५६



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## जंगल-कामगारांची सहकारी संघटना

### मुंबई राज्य जंगल कामगार सहकारी सोसायट्यांची परिषद

वरील परिषदेचें आठवें अधिवेशन कासा ( जि. ठाणें ) येथें १४, १५ व १६ एप्रिल रोजीं भरलें होतें. परिषदेचें उद्घाटन भारत सरकारच्या गृहखात्याचे उपमंत्रि श्री. बी. एन्. दातार ह्यांनीं केलें. अध्यक्षस्थानीं मुंबई राज्याचे भूतपूर्व प्रधानमंत्री. श्री. बा. गं. खेर होते. मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिटयूटचे चेअरमन, श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांनीं आपल्या स्वागतपर भाषणांत जंगल-कामगारांच्या सहकारी संघटनेचें वैशिष्ट्य वर्णन केलें. इटलीमध्यें अशा संघटना होत्या; ३१ वर्षांपूर्वी मुंबई राज्यांत त्या दिशेनें प्रयत्न झाले, परंतु ही चळवळ थंडावली, ती १९४७-४८ मध्यें पुन: जोरानें चालू करण्यांत आली. मद्रासमध्यें सुद्धां ही चळवळ अधिक दृढमूल झाली, तरी मुंबई इतकी यशस्वी झाली नाहीं. पंजाबांत सार्वजनिक बांधकामांसाठी कामगारांच्या सोसायट्यांचा उपयोग करण्यांत येत आहे. मुंबई राज्यांतहि, जंगल-कामगारांच्या सोसायट्या सोडल्या, तरी इतर कामगारांच्या ९४ सोसायट्या काम करीत आहेत; त्यांना कंत्राटें देण्याच्या बाबतींत प्राधान्य मिळत आहे. पन्ना येथील खासगी मालकीच्या हिऱ्याची खाण भारत सरकार आपल्या ताब्यांत घेणार असून, त्या खाणीचें काम सहकारी कामगार संस्थांच्या साहाय्यानें करण्याचा सरकारचा विचार असल्याचें नैसर्गिक संपत्ति खात्याचे मंत्री, श्री. मालवीय ह्यांनीं लोकसभेंत सांगितलें आहे. "पृष्ठ-भागावरील हिऱ्यांची काढणी सहकारी कामगार संस्थांमार्फत करण्यांत येईल" असें त्यांनीं जाहीर केलें आहे. मुंबई राज्यांत आदिवासींची संख्या एकूण लोकसंख्येच्या सुमारें एकदशांश इतकी आहे, व कांहीं जिल्ह्यांत तर त्यांच्या संख्येचें प्रमाण पुष्कळच जास्त आहे. त्यांची मिळकत फारच थोडी असून, दीर्घ काळ त्यांना बेकार रहावें लागतें. झाडें तोडणें व कोळसा करणें हा त्यांतील बहुतेकांचा व्यवसाय असून, त्यांची पिळवणूक थांबवून त्यांची पातळी वाढविण्यासाठी त्यांची सहकारी तत्त्वावर संघटना करण्यांत आली आहे. श्री. खेर ह्यांनीं आपल्या भाषणांत आदिवासींच्या उद्धाराचें महत्त्व वर्णन केलें, खेड्यांच्या सुधारणां-बरोबर जंगली व डोंगराळ विभागांच्या उद्धाराचेंहि अगत्य प्रतिपादन केलें आणि व्यापक दृष्टीनें, नव्या सामाजिक दृष्टि-कोनांतून, ह्या प्रश्नाचा विचार करून 'परिश्रमालया' च्या चळवळीचा संदेश दिला.

---

### अन्नपूर्णा उपाहारगृहांस झालेला फायदा

अ. भा. महिलांच्या मध्यवर्ति अन्नमंडळाच्या व तिच्या शाखांच्या अन्नपूर्णा उपाहारगृहांना १९५५-५६ मध्यें झालेला फायदा ६२,००० रुपये असून झालेल्या तोटयाची बेरीज ५१,००० रुपये आहे. १९५०-५१ ते १९५४-५५ या मुदतींत अंदाजें २.१८ लक्ष रुपये फायदा झाला.

## बँकिंगच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण होणार नाहीं

लोकसभेंतील चर्चेच्या वेळीं, अर्थमंत्र्यांनीं आश्वासन दिलें, कीं बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या बाबतींत सरकार आणखी पुढें जाणार नाहीं. रिझर्व्ह बँकेचें व्यापारी बँकांवर जें नियंत्रण आहे, तें इष्ट हेतु साध्य करण्याच्या दृष्टीनें पुरेसें आहे, असें ते म्हणाले. बँकिंगच्या धंद्याच्या राष्ट्रीयीकरणाचा विचार सरकार करीत नसल्याचें, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. रामराव, ह्यांनींहि स्पष्टपणें सांगितलें आहे. कांहीं प्रमुख बँकांचे तुलनात्मक आकडे येथें दिले आहेत, ते ह्यासंबंधांत उद्बोधक वाटतील.

### कांहीं प्रमुख हिंदी बँकांच्या ठेवी व नफे

| | ठेवी ( कोटी रु. ) | | नफा ( कोटी रु. ) | |
|---|---|---|---|---|
| | १९५४ | १९५५ | १९५४ | १९५५ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया | १,२३९७ | १,२८,६६ | ७७८८ | ७८.९७ |
| बँक ऑफ इंडिया | ६०.३८ | ६७.५५ | ७०.०१ | ८४.९० |
| पंजाब नॅशनल बँक | ७५.६३ | ... | ५३.७५ | ६४.४१ |
| युनायटेड कमर्शिअल बँक | ४०.२२ | ४७.६९ | ३१.०९ | ३६.६९ |
| बँक ऑफ बरोडा | ३४.८५ | ४०.५२ | २८.०२ | २९.६५ |
| अलाहाबाद बँक | ३३.०१ | ३५.९० | १६.१४ | १५.६१ |
| हिंद बँक | ४.०७ | ५.१२ | ६.५६ | १०.८६ |
| युनियन बँक ऑफ इंडिया | ५.८८ | ९.१० | ६.७५ | ९.४५ |
| इंडियन ओव्हरसीज बँक | ११.२९ | ... | १३.३५ | १६.५६ |
| इंडियन बँक लि. | २४.७१ | २९.४४ | १३.९४ | २०.२८ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ४.११ | ५.०६ | ३६० | ३.८१ |

---

## शेअर ट्रॅन्स्फरवरील स्टँपड्यूटी १०० रु.स एकजात १२ आणे

१ एप्रिल, १९५६ पासून सबंद भारतभर प्रत्येक १०० रु. स १२ आणे ह्या दरानें शेअर्सच्या वर्गीवर्गीवर एकजात ड्यूटी भारत सरकारनें ठेवली आहे. ह्यापूर्वी, वेगवेगळ्या राज्यांत वेगवेगळ्या दरानें ड्यूटी लादली जात असे. उदाहरणार्थ, मुंबईंत ती १ रु. ८ आ., मद्रासमध्यें १ रु. ८ आ., कानपूरमध्यें १५ आ., कलकत्ता, येथें १२ आ., आणि त्रावणकोर-कोचीनमध्यें ८ आ. होती. नव्या दरामुळें, मुंबई, मद्रास व कानपूर येथील भागदारांचा फायदा होईल. त्रावणकोर-कोचीन मधील भागदारांना ज्यास्त दरानें ड्यूटी भरावी लागेल. डिसेंबर, १९५५ मध्यें पार्लमेंटनें इंडियन स्टँप्स ॲक्टांत दुरुस्ती करून, शेअर ट्रॅन्स्फरवर ड्यूटी बसविण्याचा राज्य सरकारांचा अधिकार स्वत:कडे घेतला व देशभर एकाच दरानें ड्यूटी घेण्याचें ठरविलें. त्याची ही अंमलबजावणी आहे.

---

### चीनला ब्रिटनचे ट्रॅक्टर्स

ब्रिटन चीनला कांहीं ट्रॅक्टर्स पाठविणार आहे. युद्धोपयोगी मालांत ट्रॅक्टर्सची गणना होत नसल्यामुळें ते पाठविणें शक्य झालें आहे. ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडकडून ह्यासंबंधीं जरूर ते परवाने ट्रॅक्टर्स तयार करणाऱ्या कारखान्यांना देण्यांत आले आहेत. नक्की किती ट्रॅक्टर्स पाठविण्यांत येणार तें मात्र जाहीर करण्यांत आलेलें नाहीं.

## रशिआंत शास्त्रज्ञांचें वाढतें महत्त्व

अलीकडे कांहीं महिन्यांत सोव्हिएट रशिआंत महत्त्वाच्या धडामोडी होत असल्याच्या वार्ता येत आहेत. ह्यांपैकी राजकारणाच्या क्षेत्रांत पडणाऱ्या घटना सोडून दिल्या तरी इतरहि कांहीं बाबतींत दूरगामी परिणाम करणाऱ्या उलथापालथी होत आहेत असें दिसतें. रशिआचे पंतप्रधान मि. बुल्गॅनिन आणि कम्युनिस्ट पक्षाचे सर चिटणीस मि. क्रुश्चेव्ह ह्यांनीं कांहीं दिवसांपूर्वी रशिअन कम्युनिस्ट पक्षाच्या बैठकींत एक महत्त्वाचें भाषण करून पाश्चिमात्त्य राष्ट्रांनीं शास्त्रीय बाबतींत केलेल्या कामगिरीला कमी लेखण्याच्या प्रवृत्तीवर कडक टीका केली. पाश्चात्य राष्ट्रांतील तंत्रविज्ञानाची कुचेष्टा करण्यामुळें खुद्द रशिआंत कित्येक क्षेत्रांतील प्रगति जलद होऊं शकली नाहीं असाहि आरोप त्यांनीं केला. ह्या सर्व टीकेचा रोख पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं केलेली प्रगति आत्मसात् करण्याचे प्रयत्न रशिआंत व्हावे, असा दिसतो. कारण, परदेशांतील वकिलातींत काम करण्यासाठी रशिअन शास्त्रज्ञांना प्रथमच पाठविण्यांत येत आहे. निदान महत्त्वाच्या अशा वकिलातींतून तरी त्यांच्यावर जबाबदारीचीं कामें टाकण्यांत येत आहेत असें दिसतें. स्टॉकहोम येथील रशिअन वकिलातींत दोघां शास्त्रज्ञांची नेमणूक करण्यांत आली आहे. त्यांपैकी एक धातुशास्त्रज्ञ असून दुसरा शेतकीतज्ज्ञ आहे. त्यांना वकिलातीचे सल्लागार म्हणून काम देण्यांत आलें आहे. खुद्द स्वीडनमधील औद्योगिक जगतांत ह्या नवीन प्रकारच्या राजनैतिक प्रतिनिधींच्या आगमनामुळें बरीच खळबळ उडाली आहे. रशिअन वकिलातींतील धातुशास्त्रज्ञ स्वीडनमधील धातु वितळविण्याच्या सर्व मोठ्या कारखान्यांची पहाणी करणार आहे, असें वृत्त आहे. रशिआंतील औद्योगीकरण ज्या प्रमाणांत विस्तारेल त्या प्रमाणांत जुने राजकारणी मागें पडून नवे तंत्रज्ञ राजकारणी पुढें येतील, असा अंदाज करण्यांत येत आहे.

## सुरत जिल्ह्यांतील सहकारी चळवळ

भारताला स्वातंत्र्य प्राप्त होण्याच्या पूर्वीच्या कालांत सुरत जिल्हा हा सहकारी चळवळीच्या बाबतींत मागासलेला असा होता. पण पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत त्यानें इतर अनेक बाबींप्रमाणें ह्याहि बाबतींत चांगली प्रगति केली आहे. ह्या पांच वर्षांच्या अवधींतील सहकारी चळवळीच्या कार्याचा जो अहवाल प्रसिद्ध झाला आहे त्यावरून असें दिसून येतें कीं सध्यां जिल्ह्यांत विविध प्रकारच्या २१६ सहकारी संस्था आहेत व त्यांनीं आपल्या कार्याचें जाळें १,८४९ खेड्यांवर पसरलेलें आहे. त्या सर्व खेड्यांची लोकसंख्या सुमारें ५ लाख आहे आणि सहकारी संस्थांच्या सभासदांची संख्या १,०३,३७४ आहे. जिल्ह्यांतील शेडयूल्ड भागांत एकूण १३१ सहकारी संस्था आहेत आणि त्यामधील सभासदांची संख्या १८,५२५ आहे. संस्थांचें खेळतें भांडवल १६,६७,२९७ रुपये आहे. पंचवार्षिक योजनेच्या कालांत त्यांनीं आपल्या सभासदांना १५,७६,६५५ रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. जिल्ह्यांतील घरांच्या सहकारी संस्थांनींहि बरीच प्रगति केलेली दिसून येते. अशा प्रकारच्या सहकारी संस्थांची एकूण संख्या ७९ आहे. खरेदी-विक्रीच्या बहुतेक सहकारी संस्थांनीं आपल्या बाजारविषयक संघटनेच्या बाबतींत पुढें पाऊल टाकलेलें आहे. त्यांनीं पांच वर्षांच्या कालांत ग्राहकांना लागणाऱ्या वस्तू आणि शेतीविषयक माल ह्यांची खरेदी केली. खरेदी केलेल्या मालाची एकूण किंमत १७ कोटी रुपये झाली. ह्याच कालांत त्यांनीं सुमारें १८ कोटी रुपये किंमतीच्या मालाची उलाढाल केली. भारतीय सरकारनें समाजवादी पद्धतीची समाजरचना ध्येय म्हणून मान्य केलेली असून ह्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी सहकाराची कांस धरण्यांत आली पाहिजे असें सांगण्यांत येत आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र सहकारी संस्थांना बिकट अडचणींना तोंड द्यावें लागतें. सुरत जिल्ह्यांतील सहकारी संस्थांना मिळालेल्या यशाची छाननी करून मार्गदर्शन करण्यांत आलें, तर तें उपयुक्तच ठरेल.

## दि कॅनरा बँकिंग कॉर्पोरेशन लि.

वरील बँकेच्या स्थापनेस १२ मार्च, १९५६ रोजीं ५० वर्षें पुरीं झालीं. 'निधी' च्या स्वरूपांत बँकेनें कामास प्रारंभ केला. दरमहा एक रुपया ह्याप्रमाणें ४५ महिने भरणा करणाराला ४६ व्या महिन्याअखेर ५० रुपये मिळावे, अशी ती योजना होती. ही योजना फारशी व्यावहारिक ठरली नाहीं व १९१७ मध्यें आर्टिकल्स बदलून कायम शेअर्सची योजना करण्यांत आली. १९३७ पर्यंत, बँकेचें अधिकृत भांडवल ३,५०,००० रुपये होतें, तर आतां बँकेचें वसूल भांडवल २०,००,००० रुपये आहे. रिझर्व्ह फंड १२,००,००० रुपयांचा झाला असून ठेवी ४,२१,७३,००० रु. व खेळतें भांडवल ५,४५,०९,००० रु. असे इतर आकडे आहेत. ७२ हिंदी शेडयूल्ड बँकांत ह्या बँकेचा अनुक्रम कसा लागतो, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| कशाप्रमाणें ? | अनुक्रम |
|---|---|
| स्थापनेचें वर्ष | ९ |
| वसूल भांडवल | ३० |
| ठेवी | २९ |
| दिलेलीं कर्जें | ३० |
| खेळतें भांडवल | २७ |
| शाखांची संख्या (४२) | २१ |
| ऑर्डिनरी शेअर्सवर डिव्हिडंड | १३ |

बँकेची सर्वच बाबतींत मोठी वाढ झाली, ती १९३६ नंतरची आहे. पहिल्या ३० वर्षांचे अखेर, तिचें खेळतें भांडवल ४६,३२,००० रु. होतें, ते ५० वर्षांचे अखेर सुमारें ५½ कोटी रुपये झालें. इतर बँकांनीं ह्या प्रगतीशीं आपली तुलना करून पहातां येण्याजोगी आहे.

**गरिबांना मोफत जमिनी**—१९५४ मध्यें आंध्र सरकारनें गरीब शेतकऱ्यांना सुमारें १,००,००० एकर जमीन विनामूल्य वाटून टाकली. त्यावेळच्या सरकारच्या धोरणास अनुसरून स्वतःची जमीन नसलेल्यांना ती देण्यांत आली. पण धोरणांत श्री. रेड्डी ह्यांच्या सरकारनें नंतर बदल केला. पडीक जमिनी आतां बाजारभावानें विकण्यांत येत आहेत.

**ग्वाल्हेरचें महत्त्व कमी होणार**—नव्यानें अस्तित्वांत येणाऱ्या मध्यप्रदेशाची राजधानी भोपाळ होणार असल्यामुळें आतांपर्यंत ग्वाल्हेर ह्या शहराला असलेलें महत्त्व कमी होणार आहे. ह्या शहराची भरभराट मुख्यतः मध्यभारताची राजधानी असल्यामुळें झाली होती. तथापि, अधिक कारखाने काढण्यांत आले, तर मात्र शहरांतील लोकांना कामधंदा मिळून कांहीं प्रमाणांत पहिलें महत्त्व टिकणें शक्य आहे.

## कंपनी कायद्याचा भारतांतील विकास

पुरातन कालापासून भारताचा परदेशांशी व्यापार चालू असुन तिबेट, चीन, मध्य आशियाई देश यांना सांधणारे व्यापारी मार्ग अस्तित्वांत होते. बाबिलोनिया, सिरिया, इजिप्त, ग्रीस, इटली, ह्या समुद्रापारच्या प्रदेशांशींहि दळणवळण असल्याचा भरपूर पुरावा आहे. तसेंच, अतिपूर्वेकडील देशांशींहि व्यापारी दळणवळण होतें. व्यापार आणि उद्योगधंदेविषयक संघटनाहि पूर्वापारपासून विद्यमान होत्या. त्यांना श्रेणी किंवा गण म्हणत व प्रमुख, जेष्ठक, श्रेष्ठित, अशा हुद्याचे अधिकारी असत. पण सध्याप्रमाणें जॉइंट स्टॉक कंपन्या मात्र तेव्हां नव्हत्या.

जॉइंट स्टॉक कंपन्यांची कल्पना पाश्चिमात्यांकडून आलेली आहे. इंग्लंडमधील जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या धर्तीवरच भारतांतील जॉइंट स्टॉक कंपन्या तयार झालेल्या आहेत. पूर्वेत वसाहतींचा विस्तार करण्याचे जे प्रयत्न झाले त्यांच्याशीं 'जॉइंट स्टॉक 'च्या कल्पनेचा संबंध आहे. वसाहती–विस्ताराच्या अनुषंगानें होणारे प्रचंड व्यवहार व्यक्तिगत साधनसंपत्तीच्या पलीकडचे असल्यामुळें, सामूहिक मालमत्ता–निर्मितीची कल्पना उदयाला आली.

साहजिकपणेंच कंपनीची मालकी बऱ्याच जणांत विभागली जाऊं लागली व हळूहळू आधीची कायदेशीर मालकीची कल्पना लयाला जाऊन शेअर्सच्या स्वरूपांत मालकांचा पैसा गुंतूं लागला. अशा प्रकारें ते कंपनीचे सदस्य व शेअर होल्डर्स होऊं लागले व शेअर्सचें हस्तांतर होण्याची सोय असल्यामुळें भागीदारीला प्रवाहित्वहि आलें. अनेक मालकांचा असा हा बारभाईचा कारभार चालण्यालायक नसल्यामुळें मालकी व कारभार ह्यांची पुढें फारकत करण्यांत आली. त्याचबरोबर शेअरच्या प्रमाणांत धोका पत्करण्याचें तत्त्व आलें व व्यवस्थेंत हात नसतांनाहि हक्क सुरक्षित रहावे अशी तरतूद कायद्यानें करणें प्राप्त झालें. त्यांतून कंपनी कायदा उदयाला आला. मालक व कारभारी यांच्यांतील संबंधांचें नियमन साधण्याच्या हेतूनें आजतागायत कंपनी कायद्याचा विकास होत आला आहे. कंपनीचा अंतर्गत व्यवहार मुक्त व्यवहाराच्या—' लायसीझ फेअर 'च्या—तत्त्वानुसार चालूं लागला व संरक्षणाची तरतूद फक्त भांडवलाचा ओघ कायम राहावा ह्या हेतूनें करण्यांत आली.

रॉयल चार्टर्स वा लेटर्स पेटंट वा पार्लमेंटनें केलेले कांहीं कायदे ह्यांच्या अनुषंगानें इंग्लिश लॉ खालील पहिल्या जॉइंट स्टॉक कंपन्या उदयाला आल्या. ह्या कायद्यानें कंपन्यांना आगळेंच कायदेशीर अस्तित्व प्राप्त करून दिलें. १८२६ सालीं ब्रिटिश पार्लमेंटच्या एका कायद्यानुसार जॉइंट स्टॉक बँकिंग कंपन्यांना सरकारी अधिकाऱ्यांनीं भरून दिलेल्या तक्त्यानुसार कारवाई करण्याचा वा स्वतःवर कारवाई होऊं देण्याचा अधिकार प्राप्त झाला. १८४४ मध्यें हाच अधिकार इतर जॉइंट स्टॉक कंपन्यांना बहाल करण्यांत आला. सदस्यांवरील जोखीम मात्र रॉयल चार्टर वा पार्लमेंटचे खास कायदे यांच्या द्वारें नियंत्रित राहिली. १८५५ मध्यें एक महत्त्वाची पुस्ती ह्या कायद्याला जोडली गेली. तिच्या योगें १८४४ च्या कायद्याखाली कंपन्यांना मर्यादित जोखमीचें—लिमिटेड लायबिलिटीचें—प्रशस्तिपत्र मिळविणें शक्य झालें.

भारतांतील पहिला कंपनी कायदा १८५० मध्यें झाला. हा कायदा इंग्लंडांतील १८४४ च्या कायद्यावर अधिष्ठित होता. आजतागायत भारतीय कंपनी कायदा इंग्रजी कंपनी कायद्याच्या धर्तीवरच विकसित होत गेला आहे. १८५० च्या कायद्याच्या अन्वयें असंस्थापित ( अनइन्कार्पोरेटेड ) कंपन्यांना व तसेंच साहित्यविषयक, विज्ञानविषयक वा धर्मादाय कंपन्यांना कलकत्ता, मुंबई व मद्रास येथील सर्वोच्च न्यायालयाच्या हुकुमान्वयें नोंदणी करणें शक्य झालें. ह्या कायद्यानें दिवाळखोर कंपन्या बंद करण्याचीहि सोय झाली. ह्या कायद्यांत अर्थात् शेअर होल्डर्सची जोखीम मर्यादित करण्याची तरतूद नव्हती. ती १८५७ च्या जॉइंट स्टॉक कंपनी कायद्यानें केलेली आहे. संस्थापनाचे रीतसर नियम व व्यापारी कंपनी व इतर संस्था गुंडाळण्यावरील निर्बंध १८६६ च्या कायद्यांत ग्रथित आहेत. १८८२ सालीं कंपनीज कॉन्सॉलिडेशन ॲक्ट पास झाला व १९१३ मध्यें त्याच कायद्याची व्याप्ति अधिक वाढविण्यांत आली. हे सर्व कायदे इंग्लंडमधील कायद्याच्या धर्तीवर आहेत.

फक्त १९३६ सालीं पास झालेल्या इंडियन कंपनीज् ( अमेंडमेंट ) ॲक्टमध्यें इंग्लिश कायद्याची फारकत आढळते. ह्या कायद्यांत मॅनेजिंग एजन्सी तयार होण्यासंबंधीचे नियम, फुटकळ कंपन्यांचें पीक येऊं नये म्हणून घातलेले निर्बंध, लवाद कंपन्यांच्या व्यवहाराच्या तपासणीची तरतूद व नोकरांचा प्रॉव्हिडंड फंड व रोखे संरक्षित राखण्याची तरतूद, हीं ग्रथित आहेत.

दुसऱ्या जागतिक युद्धाच्या काळांत जॉइंट स्टॉक कंपन्यांचें एकदमच पेव फुटलें. लढाईच्या काळांत ह्या कंपन्यांना बेफाम उत्पन्न झालें व लढाई संपतांच एकदम मंदी आली. त्याचबरोबर कंपन्यांच्या व्यवहारांत अनिष्ट प्रकार बोकाळूं लागले. निधि व शेअर्स भल्या मोठ्या प्रमाणावर दडपून ठेवण्याचे व इतरहि कांहीं प्रकार होऊं लागले. मोठे मोठे उद्योगपति ग्राहकोपयोगी मालाचें उत्पादन, विक्री, येवढेंच नव्हे तर त्यांच्या किंमती यांवर आपल्या मतलबानुसार नियंत्रण गाजवूं लागले. परिणामीं, शेअर होल्डर्सचेंहि नुकसान होऊं लागलें. ह्यामुळें जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या व्यवहारांत कार्यक्षमता व सचोटी यावी म्हणून प्रभावी असें सरकारी नियंत्रण घालण्याची मागणी वाढूं लागली.

सन १९४७ मध्यें इंग्लिश कंपनी ॲक्ट परत दुरुस्त करण्यांत आला. इकडेहि भारतांत थोड्या परिशीलनानंतर १९५० च्या आक्टोबरमध्यें भाभा समिति नियुक्त करण्यांत आली. ह्या भाभा समितीनें सुचविलेल्या कांहीं तात्पुरत्या शिफारशी ग्रथित करून १९५१ चा इंडियन कंपनीज ( अमेंडमेंट ) ॲक्ट निकडीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी पास करण्यांत आला. या कायद्यानुसार चालू व्यवस्थेंत बदल करतांना मॅनेजिंग एजन्टस्, मॅनेजिंग डायरेक्टर्स, डायरेक्टर्स व मॅनेजर्स यांच्या नेमणुकींच्या व मेहेनतान्याच्या अटीस सरकारी संमति घेण्याचा निर्बंध घालण्यांत आला. भाभा समितीनें केलेल्या कार्याची अखेर १९५६ च्या कंपनी कायद्यांत परिणति झाली.

ह्या स्थित्यंतरांत कंपनी कायद्याची बैठक बदलली. पूर्वी कंपनी कायदा शेअर होल्डर्सना संरक्षण देण्याचें कार्यच प्रायः करी. आतां त्याची व्याप्ति संपत्तीचें केंद्रीकरण टाळण्यापर्यंत व थोड्यांच्या हातांत आर्थिक सत्ता जाऊं नये व अनिष्ट प्रकार वाढूं नयेत म्हणून निर्बंध घालण्यापर्यंत वाढली. ह्या कायद्यानुसार नेमणुकीच्या अटी, व्यवस्थापक मंडळाचे अधिकार, मॅनेजिंग एजंटस्, मॅनेजिंग डायरेक्टर्स, मॅनेजर्स, चिटणीस, खजिनदार यांचा मेहनताना, तसेंच व्यवस्थापक मंडळाचा एकूण मेहनताना, मॅनेजिंग डायरेक्टर्सची संख्या, डायरेक्टर्सची वयोमर्यादा व मॅने-

जिंग एजन्सीची विक्री वा खरेदी, या विषयींचें नियंत्रणाचे अधिकार सरकारनें आपल्याकडे घेतले आहेत. विलंबित म्हणजे डिफर्ड शेअर्सचें उच्चाटन करून व शेअर्सनुसार प्रमाणांत मतदानाचे अधिकार देऊन शेअर होल्डर्सना कंपनीच्या व्यवस्थेवर नियंत्रण गाजविण्याची संधि देण्याचा प्रयत्न ह्या कायद्यांत आहे.

माहितीपत्रकांतून व आयव्ययनिदर्शक पत्रांतून तपासणी सुलभ व्हावी म्हणून अधिक माहिती देणें भाग पाडणें, कंपन्यांच्या आपापसांतील जखडबंदीवर प्रतिबंध घालणें व डायरेक्टर्स आणि शेअर होल्डर्स यांच्यावर अधिक निर्बंध बसविणें अशीं ह्या कायद्याचीं इतर वैशिष्ट्यें आहेत. मॅनेजिंग एजन्सी पद्धतीची पुनर्रचना घडवून आणण्यासाठी केलेल्या तरतुदी व त्याचबरोबर चिटणीस व खजिनदार यांच्या संस्थेला देण्यांत आलेली कायदेशीर मान्यता कायद्यांतील परिवर्तनाची निदर्शक असून कंपन्यांच्या कारभारावर त्यांचा दूरवर परिणाम होण्यालायक आहे. कंपन्यांचें संयुक्तीकरण व पुनर्रचना करण्यास हुकूम देण्याचे अधिकार व तसेंच विघटनादर म्हणजे लिक्विडेशनवर योग्य तें नियंत्रण राखण्याचे अधिकारहि ह्या कायद्यानें सरकारला दिले आहेत.

कृतीचें स्वातंत्र्य मात्र व्यापार व उद्योगधंद्यांतील लोकांना लाभावें ह्याकडे दुर्लक्ष होऊं देण्यांत आलेलें नाहीं. कायद्यांत कांहीं नियंत्रणें शिथिल करण्याचीहि तरतूद आहे. ह्या योगें कांहीं राष्ट्रोपयोगी उद्योगधंद्यांस व व्यापारास पुरेपूर अवसर लाभावा असा त्यामागील हेतु आहे.

आतां सरकारी क्षेत्रांत व्यापार-उद्योगधंदे चालविणाऱ्या कंपन्यांची स्थापना होत असून, अशा कंपन्यांच्या व्यवहाराचें यथायोग्य नियंत्रण कसें साधावें हा आगामी प्रश्न आहे.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल मांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७,००० |
| एकूण खेळतें मांडवल | रु. | ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.


शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन


**म्हैसूर सरकारची [illegible]**—[illegible] इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज आणि हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट ह्या कारखान्यांत आप[illegible] गुंतविलेलें भांडवल परत करण्यांत यावें किंवा त्याचे पांच ट[illegible] नफ्याच्या अग्रहक्काच्या भागांत रूपांतर करण्यांत यावें, अ[illegible] मागणी म्हैसूरच्या सरकारनें केली होती. परंतु मध्यवर्ती सरकार[illegible] ही मागणी मान्य करतां येत नाहीं, असें म्हैसूरच्या सरकार[illegible] कळविलें आहे.

**प्राचीन मनुष्यवस्तीचा शोध**—म्हैसूर संस्थानच्या पुराणवस्तु-संशोधन खात्याला एका डोंगरांत प्राचीन काळच्या मनुष्यवस्तीच्या खुणा आढळून आल्या आहेत. ही वस्ती ३० ते ४० हजार वर्षांपूर्वीची असावी असा अंदाज आहे. त्यावेळच्या माणसांनीं वापरलेलीं दगडाचीं व इतर हत्यारें सांपडलीं असू[illegible] त्यांपैकीं कांहीं म्हैसूरच्या संबंधित खात्याच्या कचेरींत आणण्यां[illegible] आलीं आहेत.

**हिराकूद येथें अल्युमिनमचा कारखाना**—हिराकूद येथें काढण्यांत यावयाच्या सरकारी मालकीच्या अल्युमिनमच्या कारखान्यांत दरसाल १०,००० टन धातु तयार होईल, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. १९५७ सालच्या मध्याच्या सुमारास कारखाना उत्पादन करूं लागेल. कारण, त्या सुमारास जरूर असलेली वीज उपलब्ध होऊं शकेल. तथापि, सर्वच अल्युमिनमचे कारखाने सार्वजनिक मालकीचे होतील असें मात्र नाहीं.

**अंदमानला विमानाची सोय**—अंदमान बेटावरील वाढत्या औद्योगिक घडामोडी लक्षांत घेऊन तेथें जाण्यासाठी विमानाची सोय करण्यांत आली आहे. विमानवाहतुकीसाठी पाण्यावर तरंगू शकणारें विमान विकत घेण्यांत आलें आहे. त्याशिवाय बोटवाहतूक करण्यासाठी आणखी एका बोटीची व्यवस्था करण्यांत आली आहे.


तमाम दंतरोगांवर

☆ नाकडछाप म्हणजेच [illegible]

## लोकसंख्या आटोक्यांत ठेवण्यासाठी उपाय !

चीन, भारत, जपान, इत्यादि देशांतील लोकसंख्येचा जागतिक लोकसंख्येतलि वाटा फार मोठा आहे, आणि नेमक्या ह्याच देशांतील लोकसंख्या झपाट्यानें वाढत आहे. इतरहि कांहीं देशांना लोकसंख्येचा प्रश्न भेडसावूं लागला आहे आणि आजचा राहणीचा कनिष्ठ व उपासमारीचा दर्जा सुद्धा टिकून कसा राहील, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

ह्या देशांतून आर्थिक प्रगति होत असली, तरी लोकसंख्येच्या वाढीची गति ज्यास्त असल्याकारणानें, दारिद्र्य कमी होण्याची आशा करीत बसण्यापलीकडे दुसरें कांहीं शक्य दिसत नाहीं. भारताच्या आर्थिक योजनांत बेकारी–निवारणास प्राधान्य दिलेलें आहे, तरी पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत नव्या रोजगारापेक्षा नवे बेकारच अधिक भरले, असा अनुभव आला आहे.

### कुटुंबनियोजनाचा सोपा उपाय !

टोकियो येथें इंटर नॅशनल प्लॅन्ड पेरेंटहूड असोसिएशनची बैठक नुकतीच भरली होती, त्यांत अधिकृतपणें असें सांगण्यांत आलें, कीं जपानमध्यें दरसाल १५ लक्ष जन्मांची नोंद होते आणि तितकेच गर्भपात सरकारांत नोंदविले जातात ! वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी, जपानी सरकारनें गर्भपातांना कायदेशीर मान्यता दिलेली आहे. ज्या गर्भपातांची नोंद होत नाहीं, असे आणखी १५ लक्ष गर्भपात दरसाल होत असावेत असा अंदाज आहे. ज्या दांपत्याला तीन अपत्यें आहेत आणि ज्यास्त अपत्यें परवडत नाहींत अशा बाबतींत, त्याचप्रमाणें प्रकृतीसाठी, गर्भपात कायद्यानें मान्य केलेला आहे. पण, प्रत्यक्ष व्यवहारांत, पडशासाठी औषध घेण्याइतकाच गर्भपात सोपा आहे असें म्हणतात. खाजगी इस्पितळांतून त्याला ४० ते ५० रु. खर्च येतो, तर सरकारी औद्योगिक विमा योजनेंत ४ ते ५ रुपयांत गर्भपात बसतो. इतर कोणत्याहि देशानें लोकसंख्या काबूंत ठेवण्याकरितां इतकी हताश योजना अंमलांत आणलेली नाहीं. भारत सरकारनें लोकसंख्येच्या प्रश्नाच्या गांभीर्याची जाणीव दाखविली आहे आणि कुटुंबनियोजन केंद्रांस प्रोत्साहन दिलें आहे. तथापि, जरूरीच्या मानानें प्रत्यक्ष उपाय फारच थोडे आहेत.

### गोळीचें संशोधन

अपत्यप्राप्तीची क्षमता चालू ठेवणें किंवा बंद करणें अगदी सोप्या रीतीनें शक्य करणारी एखादी गोळी अजून कोणीहि शोधून काढलेली नाहीं. "अँटीमेटॅबोलाइटिस्" सारख्या पदार्थांच्या सेवनामुळें नुकताच धरलेला गर्भ नाश पावतो, पण हा परिणाम १००% खात्रीचा नाहीं आणि बाळंतपण टळलें नाहीं तर जन्मणारें मूल विचित्रच निघेल व आईलाहि धोका प्राप्त होईल. तथापि, ह्या दिशेनें आज संशोधन चालू आहे. इकडे, मृत्यूंचें प्रमाण घटविण्यांत मात्र प्रशंसनीय यश येत आहे !

### अमेरिकेंतील वेगळी परिस्थिति

अमेरिकेंत सुद्धां लोकसंख्येंत प्रचंड वाढ होत आहे. तेथील लोकसंख्येमध्यें दरसाल ३० लाखांची भर पडत आहे. तथापि, अमेरिकन उद्योगपती ह्या वाढत्या लोकसंख्येचें स्वागत करीत आहेत. कारण, त्यामुळें त्यांच्या मालास नवें गिऱ्हाईक निर्माण होत आहे. अमेरिकेच्या संपत्तींत लोकसंख्येपेक्षा ज्यास्त गतीनें वाढ होत असल्यामुळें, तेथील कुटुंबांचे घटक वाढले, कीं मोटारींना मागणी वाढली, असें होतें. नवी गाडी घेतली, तरी जुनीहि तशीच चालू ठेवतात; दोन्ही गाड्या वापरणें त्यांना परवडतें. १९७५ मध्यें, बहुसंख्य कुटुंबें तीन किंवा अधिक मोटारगाड्या ठेवतील, असा अंदाज आहे. जी गोष्ट मोटारगाड्यांना लागू आहे, तीच इतर उत्पादनासहि लागू आहे. उत्पादनाचें तंत्र सुधारत गेलें, कीं त्याचा फायदा अधिकाधिक प्रमाणांत लोकांना मिळूं लागतो, अशी अमेरिकेंतील परिस्थिति आहे. निदान आज तरी, अमेरिकेंतील जननाचें मोठें प्रमाण त्या देशास हिताचें वाटत आहे. राहणीचें मान सुधारलें व शिक्षणाचा प्रसार झाला, म्हणजे जननाचें प्रमाण उतरतें, हा सिद्धांत अमेरिकेंत खोटा ठरूं पहात आहे.

### भारतांत नोंदविलेल्या कंपन्यांची ( पब्लिक आणि प्रायव्हेट ) वर्गवारी दाखविणारें पत्रक
( संख्या व वसूल भांडवल )
( आंकडे कोटी रुपयांत )

| ३१ मार्च रोजीं संपलेलें वर्ष | सर्व कंपन्या | | पब्लिक कंपन्या | | प्रायव्हेट कंपन्या | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | वसूल भांडवल | संख्या | वसूल भांडवल | संख्या | वसूल भांडवल |
| १९१६–१७ | २,५१३ | ९०.९ | २,३०६ | ८५.० | २०७ | ५.८ |
| १९१८–१९ | २,७८९ | १,०६.० | २,३५० | ९५.६ | ४३९ | ११.० |
| १९२७–२८ | ५,८३० | २,७६.४ | ४,१०८ | २,०४.९ | १,७२२ | ७१.५ |
| ( ब्रह्मदेश सोडून ) | | | | | | |
| १९३८–३९ | ११,११४ | २,९०.० | ६,८५९ | २,१३,० | ५,२५५ | ७७.० |
| १९४५–४६ | १७,३४३ | ४,२४.४ | १०,१२९ | ३,२३.० | ७,२१४ | १,०१.० |
| ( फक्त भारत ) | | | | | | |
| १९५०–५१ | २८,५३२ | ७,७५.४ | १२,५६८ | ५,६६.५ | १५,९६४ | २,०८.९ |
| १९५१–५२ | २९,२२३ | ८,५५.८ | १२,४१३ | ६,०६.८ | १६,८१० | २,४८.९ |
| १९५२–५३ | २९,३१२ | ८,९७.६ | १२,०५५ | ६,२८.८ | १७,२५७ | २,६८.९ |
| १९५३–५४ | २९,५२८ | ९,४४.९ | १०,२४८ | ६,३१.३ | १९,२८० | ३,१३.६ |
| १९५४–५५ | २९,७७९ | ९,८३.१ | १०,०५९ | ६,५६.० | १९,७२० | ३,२७.१ |
| १९५५ ( डिसेंबर ) | २९,९४८ | १०,१३.३ | ९,९७६ | ६,८१.१ | १९,९७२ | ३,३२.२ |

**( १९४४-४५, १९४७-४८, १९५४-५५ या वर्षाच्या अखेरीस प्रमुख राज्यांतील कंपन्यांची संख्या व त्यांचे वसूल भांडवल दाखविणारें पत्रक )**

( आंकडे कोटी रुपयांचे )

| राज्यें | १९४४-४५ | | १९४७-४८ | | १९५४-५५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कं. संख्या | वसूल भांडवल | कं. संख्या | वसूल भांडवल | कं. संख्या | वसूल भांडवल |
| आसाम | २६६ | २·३ | ४०१ | २·६ | ३७५ | ४·६ |
| बंगाल | ५९४१ | १,४७·५ | ८५१४ | १,९३·६ | १२११६ | ३,१८·५ |
| बिहार | २१९ | ६·७ | ४१३ | ११·० | ५१६ | २७·० |
| ओरिसा | २९ | ·२ | ९७ | २·८ | १८५ | ६·१ |
| मुंबई | २४१० | १,३७·७ | ४१३० | २,०४·४ | ५०८३ | ३,२२·६ |
| मध्यप्रदेश | १६३ | १·८ | ३१९ | ४·१ | ७०६ | ८·० |
| मद्रास | १८१६ | २६·७ | ३२०९ | ४७·४ | २८६८ | ६९·० |
| पंजाब | १३२२ | १३·१ | १६०७ | १५·९ | ११०५ | १४·६ |
| उत्तर प्रदेश | ७१४ | १०·४ | १२४१ | १५·६ | १७६५ | ३५·९ |
| म्हैसूर | २२९ | ४·५ | ३७४ | ८·३ | ५०५ | २८·४ |
| त्रावणकोर-कोचीन | — | — | ९८९ | १७·० | १०२४ | २८·५ |
| त्रावणकोर | ४३६ | ५·० | — | — | — | — |
| कोचीन | १११ | १·३ | — | — | — | — |
| दिल्ली | ४६३ | १०·९ | ९०५ | २५·४ | १४९९ | ३६·७ |

## विद्यार्थिनींची समाज व ख्रिस्तसेवा

मद्रास येथील वुइमेन्स ख्रिश्चन कॉलेजांतील विद्यार्थिनींच्या समाज व ख्रिस्तसेवेची माहिती चर्च मिशनरी सोसायटीच्या मुखपत्रांत प्रसिद्ध झाली आहे, ती मोठी उद्बोधक आहे.

प्रत्येक रविवारीं कॉलेजच्या बसमधून मावतील तेवढ्या विद्यार्थिनींना मद्रास जवळच्या खेड्यांत नेण्यांत येतें. तेथें ह्या विद्यार्थिनी खेडुतांना शिकविण्याचें काम करतात, व एकदोघी घरोघर जाऊन वास्तपुस्त करतात. प्रत्येक शुक्रवारीं, ह्याच खेड्यांना विद्यार्थिनींचा दुसरा एक गट भेट देतो, स्थानिक जिन्नस अधिक चांगले शिजविण्यास शिकवितो, बालसंगोपनाचे धडे देतो आणि अशक्त मुलांना दुधाची पावडर व व्हिटॅमिन वाटतो.

कॉलेजांतील नोकरवर्गासाठी विद्यार्थिनी साक्षरतेचे व बायबलचे वर्ग चालवितात, त्याचा परिणाम म्हणजे जे नोकर ख्रिस्ती नसतात, ते ख्रिस्ती होण्यास तयार होतात. नोकरांना दुपारच्या वेळीं गरम अन्न वाढण्याचें काम विद्यार्थिनी पाळीपाळीनें करतात.

विद्यार्थिनींच्यासाठी उत्कृष्ट भोजनगृह आहे, पण नोकरांच्यासाठी तशी सोय नव्हती. तेव्हां, त्यांचेसाठी भोजनगृह व स्वैपाकगृह बांधण्यासाठी विद्यार्थिनींनीं श्रमदान करण्याचें ठरविलें. हिंदु कंत्राटदारानें मोठ्या खुषीनें मार्गदर्शन केलें व कांहीं मालहि मोफत पुरवला. एकानें विजेचे दिवे मोफत बसवून दिले. विद्यार्थिनींच्या समाजसेवेचा ख्रिस्तेतर लोकांवर परिणाम न झाला, तरच नवल! मद्रास राज्याच्या मुख्य मंत्र्यांनीं ह्या इमारतीचें उद्घाटन केलें, हें योग्यच! त्यामुळें विद्यार्थिनींच्या समाजसेवेस व ख्रिस्तसेवेस प्रोत्साहनच मिळालें.


**दि रत्नाकर बँक, लिमिटेड**

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

**दि बेळगांव बँक लिमिटेड**

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. २,४६,००० |
| ठेवी | रु. १,८५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.